शनिवार
१२ डिसेंबर २०१५
पुढारी

# पर्यावरण संवर्धनासाठी तरुणांचा पुढाकार आवश्यक : ना. आर्लेकर

दोडामार्ग : वार्ताहर

जागतिक तापमानवाढीमुळे जग जळत आहे. पृथ्वीवरील संपूर्ण सजीवसृष्टी धोक्यात आली आहे. पर्यावरणाच्या असंतुलनामुळे दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी यासारख्या भयानक संकटांना थांबवायचे असल्यास तरूणांनी पुढाकार घेवून पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपाययोजना राबवाव्यात. केवळ चार भिंतींच्या आत राहून पुस्तकी पर्यावरण न शिकता आपल्या संस्कृतीचा व परिसराचा अभ्यास करावा. संस्कृतीनेच आपल्याला पर्यावरण संवर्धन शिकविले आहे, असे प्रतिपादन गोवा राज्याचे वन, पर्यावरण व पंचायतमंत्री राजेंद्र आर्लेकर यांनी केले.

मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवायोजना विभाग व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने केर येथे आयोजित केलेल्या सात दिवशीय विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. मुंबई विद्यापीठ महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक अनिल पाटील, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे, केर-भेकुर्ली ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच प्रेमानंद देसाई, संस्थेचे सचिव मोहन खातू, सदस्य भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये होते. पर्यावरण संवर्धन ही मध्यवर्ती कल्पना डोळ्यासमोर ठेवून शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ना. आर्लेकर पुढे म्हणाले, तरूणाई ही अशी आहे की ती काहीही करू शकते. भारतात आज ६ टक्के तरूण आहेत. त्यांच्या आधारावर आपण कोणतीही बाजी सहज मारू शकतो. फक्त त्यासाठी तरूणांनी एकत्र येण्याची गरज आहे. प्रत्येकामध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण झाली पाहिजे. केवळ मार्कवान न होता गुणवान बना, आदर्श नागरिक बना. यासाठी हे शिबिर तुम्हाला नीतीमूल्य शिकवेल. शिबिरातील संस्काराची ही सारी शिदोरी आयुष्यभर पुरेल. त्यासाठी संस्कृतीच्या जवळ जा. तिला समजावून घ्या, आपोआप पर्यावरणाचे संवर्धन होईल, असा उपदेशही त्यांनी स्वयंसेवकांना केला.

प्रारंभी एसएसएस गीत व दीपप्रज्वलनाने शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे व बीसीयुडीचे संचालक डॉ. अनिल पाटील यांनीही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. एनएसएसचे खरे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांनी खेड्यात जावून तेथील जीवन समजावून घेणे व आजूबाजूच्या साधनसामुग्रीचा योग्य वापर करून उत्पन्न कसे घ्यावे हे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात शिकावे आणि त्याचा प्रचार करावा हे आहे. एक आदर्श विद्यार्थी कसा बनेल, व्यक्तिमत्त्व विकास कसा करता येईल हे यासारख्या शिबिरातून शिकायला मिळते असे ते म्हणाले. गावचे सरपंच प्रेमानंद देसाई यांनी यावेळी गावात राबविलेल्या विविध योजना तसेच गावाला मिळालेल्या विविध पुरस्कारांची माहिती दिली. प्रा. बिडवे यांनीही आपल्या मनोगतात पर्यावरण संवर्धनाचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अभिजीत हेगशेटये यांनी प्राचीन संस्कृती आपणास उर्जा देण्याचे काम करते. ती आपल्याला पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा देते, असे सांगितले. यावेळी त्यांच्या हस्ते ना. आर्लेकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. अनिल पाटील, प्रा. बी. एस. बिडवे यांचा सत्कार ना. आर्लेकर यांच्या हस्ते करण्यात आला. या शिबिरास मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील स्वयंसेवक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. मोरे व डॉ. एस. यु. दरेकर यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सोपान जाधव तर आभार प्रा. आर. ए. मोरे यांनी मानले.